अतितात्काळ/महत्वाचे

क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.८/विशा-१अ
दि. ३१.०१.२०२५

डॉ. इक्बाल सिंग चहल, भा.प्र.से.
अपर मुख्य सचिव (गृह)
Dr. Iqbal Singh Chahal, I.A.S.
Additional Chief Secretary (Home)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक

विषय :- गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना तातडीने पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ :- पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. स्मारके २०२४/ प्र.क्र.०६/सां.का.३, दि. २०.०१.२०२५.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाकिंत शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

२. राज्यामध्ये सद्यस्थितीत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत एकूण ४७ केंद्र संरक्षित किल्ले आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय अंतर्गत ६२ राज्य संरक्षित किल्ले आहेत. सदरहू केंद्र व राज्य संरक्षित किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता व हा सांस्कृतिक वारसा सुस्थितीमध्ये ठेवण्याकरीता केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले यांच्या ठिकाणी अतिक्रमणामुळे त्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणे, वास्तुच्या सौंदर्यास/रम्यतेस/पावित्र्यास बाधा पोहोचणे इत्यादी बाबी संभवित आहेत.

मा. मुख्यमंत्री यांच्या सूचनांनुसार, जिल्हा स्तरावरील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले यांची अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच पुनश्चः अतिक्रमणे होवू नयेत, यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन शासन निर्णयान्वये जिल्हास्तरीय समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

३. सदर समित्या दि. ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत आढावा घेऊन कोणकोणत्या गड-किल्ल्यांवर अतिक्रमणे आहेत, त्याची किल्लानिहाय यादी तयार करणार आहेत. समित्या दि. ०१ फेब्रुवारी, २०२५ ते दि. ३१ मे, २०२५ पर्यंत कालबध्द पध्दतीने अतिक्रमणे हटविण्याचे काम करणार आहेत. संबंधित सर्व पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक यांनी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून (Local Independent Bodies) अतिक्रमणे दूर करणे अथवा पुन्हा अतिक्रमणे होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात असताना जिल्हाधिकारी यांना तातडीने पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याची दक्षता घ्यावी व त्याबाबतचा कार्यपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

31/1-25

(डॉ. इक्बाल सिंह चहल)
अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :
१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. निवडनस्ती/ विशा-१ अ

निर्गमित केले
दिनांक : 31/01/25
सही :

गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच पुन्हा अतिक्रमणे होवू नयेत, याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक :स्मारके २०२४/प्र.क्र.०६/सां.का३.
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० जानेवारी, २०२५

वाचा -

१. प्राचीन स्मारक तथा पुरातत्वीय स्थल और अवशेष अधिनियम, १९५८
२. प्राचीन स्मारक तथा पुरातत्वीय स्थल और अवशेष नियम, १९५९
३. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०
४. महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष नियम, १९६२

**प्रस्तावना :**

राज्यामध्ये सद्यस्थितीत भारतीय पुरातत्व सर्वेक्षण अंतर्गत एकूण ४७ केंद्र संरक्षित किल्ले आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय अंतर्गत ६२ राज्य संरक्षित किल्ले आहेत. सदरहू केंद्र व राज्य संरक्षित किल्ले यांचे जतन व संवर्धन करण्याकरीता व हा सांस्कृतिक वारसा सुस्थितीमध्ये ठेवण्याकरीता त्यावर अतिक्रमण होऊ नये याद्दष्टीने दक्षता घेणे आवश्यक आहे.

तथापि, केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले यांच्या ठिकाणी अतिक्रमण होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. यामुळे केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले यांच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणे, वास्तुच्या सौंदर्यास / रम्यतेस/ पावित्र्यास बाधा पोहोचणे इत्यादी बाबी संभवित आहेत. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या सूचनांनुसार, जिल्हा स्तरावरील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले यांची अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच पुनश्चः अतिक्रमणे होवू नयेत, यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

जिल्ह्यातील केंद्र व राज्य संरक्षित किल्ले आणि असंरक्षित गड-किल्ले या ठिकाणची अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच अतिक्रमणे पुन्हा होवू नयेत, यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे -

| क्र. | पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | पोलीस आयुक्त (संबंधित नागरी भागाकरीता) | सदस्य |
| ३. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४. | जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| ५. | आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ६. | मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपालिका / नगरपंचायत (संबंधित नागरी भागाकरीता) | सदस्य |
| ७. | संबंधित उप वनसंरक्षक (वनक्षेत्र असेल तेथे) | सदस्य |
| ८. | संबंधित अधिक्षण पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, भारत सरकार | सदस्य |
| ९. | सहाय्यक संचालक (पुरातत्व), विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय | सदस्य |
| १०. | प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ (आवश्यकतेनुसार) | सदस्य |
| ११. | निवासी उप जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

**०२. समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील -**

१. दि. ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत सदर समितीने आढावा घेऊन कोणकोणत्या गड-किल्ल्यांवर अतिक्रमणे आहेत त्याची किल्लानिहाय यादी तयार करावी. सदर यादी तातडीने शासनास सादर करावी.

२. दि. ०१ फेब्रुवारी, २०२५ ते दि. ३१ मे, २०२५ पर्यंत कालबध्द पध्दतीने अतिक्रमणे हटविण्याचे काम करावे व वेळोवेळी केलेल्या कामांचा अहवाल शासनास सादर करावा.

३. सर्व अतिक्रमणे हटविल्यानंतर पुनःश्च त्याठीकाणी अतिक्रमणे होणार नाहीत, याची दक्षता समितीने घ्यावी.

४. सदर समितीची बैठक दरमहा आयोजित करण्यात यावी.

५. सदर समितीचा मासिक अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०१२०१८२९२३८६२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL DEPARTMENT,
2.5.4.20=281d8ee0076aee3a052a490903f93dcadef9f7e2a186620ec03666d244838270, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BAF9D9317025580944685E04789C52D64C53268
4054F19E1F02C374878E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2025.01.20 18:32:16 +05'30'

( नंदा राऊत )

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, मुंबई.
६. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, मुंबई.
७. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, मुंबई.
८. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, मुंबई.
९. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व मा. महाराष्ट्र विधानसभा सदस्य व मा. महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य.
११. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
१२. सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहायक
१४. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१५. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य.
१७. सर्व महानगर पालिका आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र
१९. अधिक्षक पुरातत्वविद्, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ, मुंबई / छत्रपती संभाजी नगर / नागपूर मंडळ.
२०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ.
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य.
२२. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, पर्यटन संचालनालय, मुंबई
२४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
२५. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपालिका/नगरपंचायत
२६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग
२७. प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ.

२८. सर्व सहाय्यक संचालक (पुरातत्व), विभागीय कार्यालय, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
२९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
३०. महालेखापाल - १ (लेखा परीक्षा), मुंबई, महाराष्ट्र.
३१. महालेखापाल - २ (लेखा परीक्षा), मुंबई, महाराष्ट्र.
३२. महालेखापाल - १ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, महाराष्ट्र.
३३. महालेखापाल - २ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, महाराष्ट्र.
३४. निवडनस्ती/ सां.का. ३